माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /४१५०/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कुंडलिक बबनराव कोहिनकर	निवासी नायब तहसिलदार उपविभागीय अधिकारी कार्यालय खेड (राजगुरुनगर), ता.खेड, जि.पुणे	उपविभागीय अधिकारी खेड उपविभाग खेड (राजगुरुनगर), जि.पुणे

(सुनावणी दिनांक- १४.०७. २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ३०.०९.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती देणेस टाळाटाळ, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
१४.०७.२०२५	जिल्हाधिकारी कार्यालय (कुळकायदा शाखा) यांचे पत्र दि.०१.०४.२०२५ चे संदर्भात आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "माहिती मिळाली नाही. " त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भात दि. २४.०४.२०२५ चे पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी तहसिलदार खेड यांना कळविल्याचे पत्र दि. २३.०७.२०२५ रोजीच्या उत्तरासोबत अपिलार्थी यांना दिले आहे."

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उत्तर दिल्याचे दिसून येते तथापी सदर उत्तरासोबत दि. २४.०४.२०२५ च्या पत्राची प्रत दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी खेड यांनी दि. ०७.१०.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये तहसिलदार खेड यांनी मूळ अर्जाच्या मागणीनुसार उपलब्ध अभिलेख पडताळून आपलेकडे उपलब्ध असलेली माहिती तात्काळ देणेत यावी असा आदेश देऊन अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. तहसिलदार खेड यांनी प्रथम अपिल आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेख आयोगास प्राप्त नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी खेड, उपविभाग खेड (राजगुरुनगर), ता.खेड, जि. पुणे यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती / वस्तुनिष्ठ उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७(६) नुसार व्यक्तीश : विनामुल्य उपलब्ध करून द्यावे.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ सत्यमेव जयते

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ / ४१५०/२०२५/पुणे 4846 दिनांक 21/10/26

रामाआ-पुणे/२०२५/NSB